Vol 3 Issue 5 June 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 5, June. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# राजकीय आस्थिरतेचे नवे संदर्भ

*प्रताप वामनराव पाटील*

राज्यशास्त्र विभाग प्रमुख
बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत ता. वसमत जि. हिंगोली

***सारांशः***

संसदीय पध्दती स्वीकृत करतांना संविधाकर्त्यांनी देशाला जबाबदार शासन असावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. परंतु मर्यादित वा सत्ताकेंद्रीत दृष्टीकोन संविधानकर्त्यांचा नक्कीच नव्हता. मात्र आपल्या राज्यकर्त्यांनी नेमका हाच दृष्टिकोन अंगिकारल्यामुळे संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कोणतीही कायमस्वरूपी यंत्रणा अंगिकारल्यामुळे संसदीय पध्दतीच्या स्वरूपाबाबत प्रचंड वैचारिक गोंधळ आपल्या राजकीय जीवनात निर्माण झाला आहे. त्याची परखड चिकित्सा करण्याचा हा एक प्रयास.

***प्रस्तावना :***

1975 पासून राजकीय अस्थिरता व भारतीय राजकारण हे समीकरणच झाले आहे. निवडणूकांत विविध राष्ट्रीय पक्षांना प्राप्त होणा–या जागांच्या संदर्भात राजकीय अस्थिरता मोजण्यास सुरूवात झाली. त्यामुळे संख्यांत्वाचे अधिष्ठान शासनास प्राप्त झाले. हाच विचार प्रबळ झाल्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण करणारे घटक कोणते?अस्थिरता शासनात आहे की, राजकारणात याचा शोध घेण्याचा प्रमाणिक प्रयत्न फारसा झाला नाही. अकराव्या व बाराव्या लोकसभेचे चित्र यापेक्षा वेगळे नाही. कारण हा बहुमताचा सोपस्कार पूर्ण करण्याचा आटापिटा म्हणजे सर्वस्वी राजकीय व्यवहार आहे. शासन निर्माण करून चालविणे व टिकविणे म्हणजे राजकीय व्यवहार स्थिरता नव्हे. देशातील परिस्थिती, तिचे राजकीय, सामाजिक व आर्थिक आधार शोधल्यानंतरच राजकीय अस्थिरता का निर्माण होते, याचा वेध घेता येईल. केवळ लोकसभेत येनकेन मार्गाने बहुमत निर्माण केले. म्हणजे देशात स्थिरता लाभू शकते हा विचारच मुळात एकांगी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, संसदीय पध्दतीचे बदलते स्वरूप, पक्षीय राजकारणाचा वाढता सत्ताकेंद्री दृष्टिकोन, त्यांची वैचारिक दिवाळखोरी, पक्षांतराचे भ्रष्ट राजकारण, संवैधानिक नीतीमत्तेला दिलेली सोडचिठ्ठी अशा विकृत व लोकशाही विरोधी राजकारणाचा अपरिहार्य गृहीत धरून राजकीय अस्थिरतेची चर्चा करावी लागेल.

***वैचारिक गोंधळ :–***

आपल्या शासनपध्दतीबाबत हा वैचारिक गोंधळ आजही कायम की, आपली शासनपध्दती लोकतांत्रिक आहे हे विधान धाडसाचे ठरेल की काय अशी भीती वाटते तरिही ते वस्तुस्थितीचा विशर्यास करणारे नक्कीच नाही याचे मुख्य कारण असे की,संसदीय पध्दती तत्वत लोकतांत्रिक असली तरी प्रत्याक्षात तशी सतेच असे नाही काही वेळा तत्व आणि व्यवहार यात अंतरही पडू शकते यामुळे संसदीय पध्दती आपला लोकतंत्रिक आत्मा गमावून बसते,आपण मात्र सर्रास संसदीय लोकशाही असा शब्दप्रयोग करित आलो आहोत, जेमतेम पन्नास वर्षाचा कालावधी ग्रहीत धरला तरी या काळात संसदीय पध्दतीला आपण तीन प्रकारचे स्वरूप दिले आहे,नेहरू शास्त्रीचा कालखंड संसदीय पध्दतीच्या दृष्टीने लोकतंत्रिक होता कारण संसदीय लोकशाहीत आवश्यक असलेल्या मूल्यांची जपणूक त्या काळात झालेली दिसून येते पुढे 1966ते 1976 हा दाहा वर्षाचा कालखंड एक पक्षीय प्रधानपध्दती बरोबरच पंतप्रधानाचे संसदेवरील अवाजवी नियंत्रण ही प्रक्रिया अधिक वेगाने घडून आल्यामुळे संसदीय पध्दतीची लोकशाही प्रत्यक्षात अस्तित्वाच नव्हती केवळ राज्यघटनेचे एकंदरित स्वरुप संसदीय लोकशाही शासनाचे असल्यामुळे आपण तत्वतः लोकशाही मान्य करत आलो आहोत, 1975 पर्यंत ही स्थिती कायम राहिली, रार्ष्टीय अणिबाणी घोषित झााल्यानंतर संसदीय लोकशाहीचा शिल्लक असलेला सांगडाही नष्ट झाला पर्यायाने तत्व आणि व्यवहार अशा दोन्ही पातळीवर संसदीय संस्था निष्प्रभ ठरल्या. संसदेमध्ये सुध्दा सार्वभैम अशा जनतेवर व लोकशाहीवर संस्था निष्प्रभ ठरल्या. संसदेमध्येसुध्दा सार्वभैम अशा जनतेवर व लोकशाहीवर कसे आक्रमण होवु शकते हा अभूतपूर्व अनुभव देशाला आला बेचाळीसावी घटना दुरुस्ती लोकशाही विरोधी पध्दतीने संसदेत मंजूर झाली. संसदेच्या स्वतंत्र्यावर झालेले हे जबरदस्त आक्रमण होते.हा राजकीय इतिहास मांडण्याचे प्रयोजन असे की,आपल्याकडे शुध्द स्वरुपात ही पध्दती मूळ धरु शकली नाही. मात्र संसदीय पध्दतीला लोकशाही अपेक्षित असते हे ग्रहीत धरू आपण तिच्या गुण दोशांची व यशापयशाची चर्चा करत आलो आहोत.मात्र या पध्दतीचे भारतीय स्वरुप कसे आहे किंवा अध्यक्षीय पध्दतीचा भारतीय पेहराव कसा असेल या बाबत गांभीर्याने कधी विचार केला नाही यामुळेच हा वैचारिक गोंधळ निर्माण झाला आहे. संवैधानिक नीतीमत्ता राजकीय नेत्यांचे चारित्र्य, राजकीय पक्षांची वैचारिक पातळी,संसदीय मूल्यांची जपवणूक या गुणांची अनुपस्थिती या पार्श्वभूमीवर राजकीय अस्थिरतेची चर्चा करावी लागेल व नवे संदर्भ शोधावे लागतहील.

***भारताचा राजकीय आजार,***

अमुक एक प्रकारची शासनपध्दती आपण अंगीकारली म्हणून आपल्या राजकीय जीवनात अस्थिरता निमार्ण झाली असे समजणे गाफीलपणाचेच ठरण्याची अधिक शक्यता आहे.वस्तुत भारताचा राजकीय आजार वेगळाच आहे.उदा. संसदीय शासन पध्दतीत ज्या स्वरुपाची

राजकीय अस्थिरता ग्रहीत असते तशी इथे फारशीकधी निर्माण झाली नाही जबाबदारीचे तत्व याबाबतही काही वेगळे चित्र नाही मंत्रिमंडळा जनतेप्रती प्रत्यक्षात जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीनां जबाबदार राहण्यापेक्षा संकुचित अर्थाने बहुमत कसे प्रप्त करता येईल याचाच विचार करु लागले अहे.त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून आयाराम . गयाराम प्रव्रतीचा  भयंकर अतिरेक होउन प्रदेशिक पक्षांना अतिरेकी महत्व प्रप्त झाले आजही बारावी लोकसभा प्रदेक्षिक  पक्षांच्याच प्रभावाखली वावरते आहे.राजकारणात कायम स्वरुपी अस्थिरता निर्माण करुन शासनात दिखउ स्वरुपाची स्थिरता निर्माण करण्याचा नवा व घातक पायंडा या पध्दतीत रुढ झााला याचाही विचार राजकीय अस्थिरतेचे संदर्भ शोधताना झाला पाहिजे. दलबदलू व वैचारिक कंगालपणा सिध्द  झालेल्या  भाष्ट व सत्तापिपासू राजकारणाला पक्षफूट असे गोंडस नाव देउन राजकारणात प्रतिष्ठित करण्यात आले.

## *पाश्चात्य मॉडेलचे अंधानुकरण*

1977 नंतर आपण अध्यक्षीय पध्दती स्वीकारावी अशी चर्चा जोरात सुरु झाली होती. माजी पंतप्रधान कै. इंदिरा गांधी या पध्दतीचे समर्थन करत होत्या.संसदीय पध्दतीत निर्माण होणाःया राजकीय अस्थिरतेवर पर्याय म्हणून अध्यक्षीय पध्दती असेच समीकरण मांडले जाते मात्र देशातील सामाजिक व राजकीय परिस्थितीच्या संदर्भात या बाबत साधक :बाधक चर्चा झाली नाही केवळ पाश्चात्य मॉडेलचे अंधानुकरण करुन चालणार नाही. मागील पन्नास वर्षाचा राजकीय अनुभव लक्षात घेता या विधानाला अधिक पुष्टी मिळते. इंग्लंड कडून आयात केलेले संसदीय मॉडेल किती प्रमाणात यशस्वी झाले याचा आलेख समोर माडला तर प्रत्येक्षात या पध्दतीतीत एकही गुण आपण आत्मसात केला नाही मात्र या पध्दतीत अंतर्भुत नसलेले अनेक दोष इथे निर्माण झाले आहेत उदा.तत्व आपली संसद इंग्लडच्या पार्लामेंट एवढी सार्वभैम नाही मात्र पक्षीय राजकारणाचा वाईट परिणाम म्हणू संसद अधिकच शेफारली आहे. त्याशिवाय काय़द्याचा अर्थ लावण्याची सत्ता न्यामंडळाकडे असूनही केवळ बहुमताच्या जोरावर राज्यघटनेत दुरुस्त्या करून न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार संसदेने अनेक वेळा मर्यादित केला. एवढेच नाही तर राज्यघटनेतील मुलभूत अधिकारात व विशेषतः खाजगी संपत्तीच्या अधिकारात एवढे बदल केले की, त्याची मोलिकताच नष्ट केली. दिखाउ स्वरूपाचा समाजवाद निर्माण करण्यासाठी लोकतांत्रिक राज्यघटनेची मोडतोड केली. तर दुस—या बाजूला विरोधी पक्षांचा क्षीण प्रतिकार हे चित्र 1989 पर्यंत कायम राहिल्यामुळे शावरील संसदीय नियंत्रण संपुष्टात आले. या संधीचा लाभ उठवत कॉग्रेसी पंतप्रधानांनी संसदेला विधेयकाचे नोंदणी कार्यालय बनविले.

या पार्श्वभूमीवर अध्यक्षीय पध्दतीचे समर्थन केले जाते, ते एवढयासाठीच की, शासनात स्थिरता निर्माण होईल. कोणत्याच एका पक्षाला सभागृहात बहुमत मिळाले नाही तर मंत्रिमंडळ अस्थिर राहते आणि पदभ्रष्ट होते. हा धोका अध्यक्षीय पध्दतीत नसल्यामुळे  तिचे जोरदार समर्थन केले जाते. परंतु इथे प्रश्न असा आहे की, राष्ट्राध्यक्ष व कायदेमंडळ या दोघात सुसंवाद प्रस्थापित होउ शकला नाही. तर राजकीय अस्थैर्य निर्माण होउ शकते. या बाबत अमेरिकेचे उदाहरण देता येईल.

## *जगरूक लोकमताचा अभाव :—*

थ्ववेचनाचा महत्वाचा मुध्दा असा की, मंत्रिमंडळ व पार्लमेंट या दोन्ही संस्थांत सुसंवाद प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नातून इंग्लंडमध्ये संसदीय पध्दतीचा विकास झाला. आपल्याकडे मात्र अनेक पक्षांचे सरकार व त्यालाही काही पक्षांचा बाहेरून पाठिंबा असे नवे पायंडे पडल्यामुळे संसद व मंत्रिमंडळ यात सुसंवाद असावा लागतो. हे तत्वच गायब झाले आहे. सत्तेचे विभाजन यातत्वामुळे निर्माण होणा—या राजकीय अस्थिरतेवर उपाय म्हणून अध्यक्षीय पध्दती असा वैचारिक गोंधळ निर्माण झाला. तेव्हा प्रणालीतील दोष दुर करून एक नवेच संसदीय मॉडेल तयार करावे लागेल. अर्थात त्यासाठी संविधानात दुरूस्ती करावी लागेल.

1980 नंतर स्थिर सरकार हा प्रचाराचा मुद्दा करणा—यांनी प्रत्यक्षात शासनाला व देशाला किती प्रमाणात  स्थिरता लाभू दिली हा संशोधनाचा विषय  होउ शकेल. 1977 सालचा अनुभवही काही वेगळा नाही. जनता पक्षाला प्रचंड बहुमत प्राप्त होउनही तो पक्ष पाच वर्षे सत्ता सांभाळू शकला नाही, तर अल्पमतात असूनही नरसिंहराव सरकारने पाच वर्षे शासन चालवून दाखविले तेव्हा या पार्श्वभूमीवरही राजकीय अस्थिरता व जबाबदारीच्या तत्वांचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. केवळ संसदीय तत्वांचे सैध्दांतिक विश्लेषण करून या शासनपध्दतीच्या यशापयाशाचे मुल्यमापन करणे संयुक्तिक ठरणार नाही.

अध्यक्षीय पध्दतीत कायदेमंडळ मंत्रिमंडळास पदभ्रष्ट करू शकत नाही व संसदीय पध्दतीत करू शकते हा तात्विक फरकही आपल्या पक्षपध्दतीमुळे प्रत्यक्षात शिल्लक राहिलेला नाही. पर्यायाने अविश्वास ठरावाच्या माध्यमातून मंत्रिमंडळ पदभ्रष्ट करणे हा अस्थिरतेचा संसदीय संदर्भ जवळजवळ संपुष्टातच आला आहे. व्ही. पी. सिंगाचे अकरा महिन्याचे व वाजपेयींचे 13 दिवसाचे सरकार यास अपवाद आहे. या बाबतही शास्त्रीय पध्दतीने अध्ययन व संशोधन करण्याची गरज आहे. केवळ पाश्चात्य शासनपध्दतीचा तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष काढण्यात व पर्याय सुचविण्यात फारसे तथ्य नाही.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net